## प्रेस नोट

### परीमंडळ २ पुणे शहर विभागातील मार्केटयार्ड पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ०८/०९/२०१८

मार्केटयार्ड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे रुस्तम रामचंद्र पाखरे, वय २३ वर्षे, रा. प्रेमनगर वसाहत, मार्केटयार्ड पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १३/२०१८ दिनांक ०८/०९/२०१८ रोजी एक वर्षाकरीता पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आणि पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम शरीराविरुध्दचे व जाळपोळीचे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द मार्केटयार्ड पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतून एक वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.